क्रमांक एमआयएस-०६१७/सीआर-५०/२०१७/तीन दिनांक १८ ऑगस्ट, २०१७

# घोषणा

## विषय :- कार्बनलेस उत्तरपत्रिकांच्या वापराबाबत उमेदवारांना विशेष सूचना.

महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत आयोजित सर्व वस्तुनिष्ठ व बहुपर्यायी परीक्षांकरीता उत्तरे नोंदविण्यासाठी कार्बनलेस उत्तरपत्रिकांचा वापर करण्यात येतो. परीक्षेच्यावेळी उमेदवारांनी सोडविलेल्या उत्तराच्या आधारे परीक्षेमध्ये किती गुण मिळाले आहेत याची उमेदवाराला माहिती ज्ञात व्हावी, निकाल प्रक्रिया पारदर्शक व अचूकपणे व्हावी, कोणत्याही तक्रारीला वाव राहू नये या हेतूने कार्बनलेस उत्तरपत्रिकांचा वापर केला जातो. त्यामध्ये उत्तरपत्रिकेचा भाग-१ (मुख्य प्रत) समवेक्षकामार्फत आयोगाकडे जमा करावयाची असते तर उत्तरपत्रिकेचा भाग-२ (दुय्यम प्रत) उमेदवाराने स्वत:कडे ठेवावयाची असते. तथापि, सदर कार्बनलेस उत्तरपत्रिकांचा वापर करताना **आयोगाने दिलेल्या सूचनांचे अनेक उमेदवारांकडून पालन होत नसल्याचे व त्यामुळे उमेदवारांचे नुकसान होत असल्याची बाब निदर्शनास आली आहे.** उदा.प्रश्नपुस्तिकेचा संच क्रमांक उत्तरपत्रिकेवर अचूकपणे न लिहिल्यामुळे काही पूर्व परिक्षांमध्ये शेकडो उमेदवारांना शुन्य गुण मिळाले. उमेदवारांकडून होणा-या चुका व परिणामी उमेदवारांचे होणारे संभाव्य नुकसान टाळण्यासाठी **कार्बनलेस उत्तरपत्रिकांच्या संदर्भात खाली नमूद केलेल्या सूचनांचे उमेदवारांनी कटाक्षाने पालन करावे** :-

(१) उत्तरपत्रिका काळजीपूर्वक हाताळावी. ती हाताळताना वा उत्तरे लिहिताना चुरगळू नये, फाडू नये अथवा टाचणी किंवा टॅगने छिद्रे पाडू नयेत. तसेच, सदर उत्तरपत्रिका पाण्याने, घामाने अथवा धुळीने खराब होणार नाही, याची दक्षता घ्यावी.

(२) उत्तरपत्रिकेवरील माहिती भरण्यासाठी व योग्य उत्तराचे वर्तुळ छायांकित करण्याकरिता **फक्त काळया शाईचे बॉल पॉईंट पेन वापरावे. हे करतांना** दुय्यम प्रतीवरही स्पष्ट खूण दिसण्यासाठी **पुरेसा दाब द्यावा.**

(३) उत्तरपत्रिकेवरील मजकुरामध्ये बदल करण्यासाठी While Fluid, Blade अथवा तत्सम साधनांचा कोणत्याही परिस्थितीत वापर करु नये.

(४) **परीक्षा कालावधीतच** उत्तरपत्रिकेवर परीक्षेचे नांव, बैठक क्रमांक (Roll Number), प्रश्नपत्रिका क्रमांक, संच क्रमांक, प्रवेश प्रमाणपत्रावर नमूद केलेला विषयाचा संकेतांक (Subject Code) योग्य ठिकाणी **इंग्रजीमध्ये व अचूकपणे नमूद करुन विहित ठिकाणी स्वाक्षरी करावी.**

(५) उत्तरपत्रिकेवर स्वत:चे नांव अथवा स्वत:ची ओळख पटेल असा कोणताही तपशील नमूद करु नये.

(६) **प्रश्नपुस्तिकेवरील इंग्रजी आद्याक्षरातील संच क्रमांक** (उदा. A,B,C किंवा D) उत्तरपत्रिकेवर **विहित ठिकाणी अचूकपणे नमूद करावा**. तसेच, सदर संच क्रमांकाचे **संबंधित वर्तुळ अचूकपणे छायांकित करावे.**

(७) **प्रश्नपुस्तिकेचा संच क्रमांक उत्तरपत्रिकेवर अचूकपणे न नोंदविल्यास शून्य गुण देण्यात येतात.**

(८) उत्तरपत्रिकेवर प्रश्नांच्या उत्तराचे संबंधित **वर्तुळ आवश्यक दाब देवून छायांकित करावे जेणेकरुन त्याचा छाप (Impression)** उत्तरपत्रिकेच्या कार्बनलेस प्रतीवर (भाग-२) वर **व्यवस्थित उमटेल** याची आत्यंतिक दक्षता घेण्यात यावी.

(९) प्रश्न क्रमांकासमोर दिलेल्या चार पर्यायांपैकी उमेदवाराने निवडलेल्या उत्तराचे वर्तुळच उत्तरपत्रिकेवर छायांकित करावे.

(१०) प्रश्नाचे उत्तर नमूद करण्याकरिता प्रत्येकी एकच वर्तुळ छायांकित करावे. एकापेक्षा अधिक वर्तुळे छायांकित केल्यास अथवा तसा कोणत्याही प्रकारे प्रयत्न केल्यास अशा उत्तरास गुण दिले जात नाहीत.

(११) एकदा नमूद केलेले उत्तर खोडता येणार नाही. नमूद केलेले उत्तर खोडून नव्याने नमूद केल्यास अथवा त्यामध्ये कोणत्याही प्रकारचा बदल केल्यास ते तपासले जात नाही.

(१२) उत्तरपत्रिकांचे मुल्यांकन करताना उत्तरपत्रिकेत नमूद केलेल्या बरोबर उत्तरांनाच गुण दिले जातात. तसेच संबंधित परीक्षेच्या परीक्षा योजनेमध्ये विहित केलेल्या प्रमाणानुसार, चुकीच्या उत्तरांमागे एका प्रश्नाचे गुण, एकूण गुणांमधून वजा करण्यात येतात.

(१३) **परीक्षेचा कालावधी संपेपर्यंत उत्तरपत्रिकेचा भाग-२ मूळ उत्तरपत्रिकेपासून कोणत्याही परिस्थितीत वेगळा करु नये, अथवा उघडण्याचा प्रयत्न करु नये.**

(१४) परीक्षेनंतर मूळ उत्तरपत्रिका (भाग-१) समवेक्षकाकडे जमा करताना ती भाग-२ पासून विहित ठिकाणी (Perforation mark वर) व्यवस्थितरित्या फाडून, वेगळी करावी.

(१५) मूळ उत्तरपत्रिकेपासून भाग-२ वेगळा करताना मूळ उत्तरपत्रिका फाटणार नाही, अथवा चुरगळणार नाही, याची आत्यंतिक दक्षता घ्यावी.

(१६) परीक्षेनंतर उत्तरपत्रिकेचा भाग-१ समवेक्षकाकडे जमा करताना उमेदवारांकडील उत्तरपत्रिकेची प्रत (भाग-२) समवेक्षकाकडे जमा करु नये.

(१७) उमेदवारांकडील **उत्तरपत्रिकेचा भाग-२ हा सुध्दा महत्वाचा दस्तऐवज असल्याने तो व्यवस्थित व सुरक्षितपणे निवडप्रक्रियेचा अंतीम निकाल लागेपर्यंत जतन करावा.**

(१८) **परीक्षेनंतर** उमेदवारांकडील **भाग-२** वर **कोणत्याही परिस्थितीत कोणत्याही प्रकारचा बदल अथवा खाडाखोड करु नये**.

(१९) निवड प्रक्रियेमध्ये जास्तीत जास्त **पारदर्शकता तसेच अचूकता** आणण्याचा आयोगाचा उद्देश असल्याने विविध प्रकारची तपासणी किंवा पडताळणी आयोगाकडून केली जाते. यामध्ये शासनाचे राजपत्रित अधिकारी होवू इच्छिणा-या उमेदवारांमध्ये आवश्यक असणारा प्रामाणिकपणा व शिस्त याची पडताळणीही होवू शकते. **त्याकरीता भविष्यात कोणत्याही टप्प्यावर उमेदवारांकडील उत्तरपत्रिकेचा भाग-२ आयोगाकडून मागविला जावू शकतो. त्यावेळी उमेदवाराने मूळ स्वरुपातील उत्तरपत्रिकेचा भाग-२ सादर करणे अनिवार्य आहे.**

**२.** सदर उत्तरपत्रिका ही आयोगाची मालमत्ता असून ती, कोणत्याही प्रकारे अनधिकृतपणे हाताळण्याची अथवा जवळ बाळगण्याची कोणत्याही व्यक्तीला परवानगी नाही. अशी कृती अनधिकृत व बेकायदेशीर समजण्यात येते.

**३.** वरील सूचनांचे काटेकोर पालन करण्यात यावे. अन्यथा आयोगाच्या सूचनांचे उल्लंघनासाठी आयोगाच्या परीक्षांना प्रतिरोधनासह (Debarment) अन्य योग्य ती कायदेशीर कारवाई होवू शकते.

सुनिल अवताडे
उप सचिव,
महाराष्ट्र लोकसेवा आयोग